महाराष्ट्र किनारी क्षेत्र प्राधिकरण या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.एमसीझेडएमए २०१७/प्र.क्र.१५८/तां.क.४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

वाचा:-

वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.

प्रस्तावना:-

राज्याच्या तटीय क्षेत्राचे पर्यावरणदृष्ट्या संरक्षण व संवर्धन करण्यासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दिनांक ३१/१२/२००८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्यात महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन केलेले आहे. त्याअंतर्गत राज्याच्या तटीय क्षेत्रातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्र निश्चित करुन त्याचे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, कांदळवनाचे संरक्षण करणे व एकूणच तटीय क्षेत्राच्या पर्यावरणीय व्यवस्थापनाच्या समन्वयाचे काम या प्राधिकरणामार्फत करण्यात येते. सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडे तयार करणाऱ्या केंद्रपुरस्कृत संस्थेशी याबाबत सामजंस्याचा करार झाला असून त्यांना कामाच्या प्रगतीआधारे रक्कम अदा करण्यात येते. सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडे तयार करणाऱ्या संस्थांना सुमारे १२ कोटी इतकी रक्कम अदा करावयाची आहे. महाराष्ट्र किनारी क्षेत्रे व्यवस्थापन प्राधिकरण (३४३५ १२९४) या लेखाशिर्षाखाली रुपये ३ कोटी २० लाख इतका निधी उपलब्ध आहे. मा. राष्ट्रीय हरित लवादाने सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडे एप्रिल अखेरपर्यंत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयास सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत ही बाब लक्षात घेता परिस्थितीकी व पर्यावरण या लेखाशिर्षाखाली राज्य नदी संवर्धन योजना (३४३५ १३२९) अंतर्गत रुपये १ कोटी ६० लाख इतका निधी महाराष्ट्र किनारी क्षेत्र प्राधिकरणास (३४३५ १२९४) या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी सुधारित अंदाज अंतिम झाले असून त्यानूसार या विभागाच्या लेखाशिर्षाखाली राज्य नदी संवर्धन योजना (३४३५ १३२९) अंतर्गत रुपये १ कोटी ६० लाख मंजूर झाले आहेत. सदरहू निधी बिम्स प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे. सदरचा निधी महाराष्ट्र किनारी क्षेत्र प्राधिकरण (३४३५ १२९४) या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर निधीचे वितरण पुढील अटी व शर्तीस अनुसरुन करण्यात यावे.

१) उपरोक्त निधी हा महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावा.

२) सदरहू निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर झाला आहे त्या प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावा.

३) महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांनी प्रत्येक वित्तीय वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र वर्ष संपल्यानंतर पर्यावरण विभागास सादर करावे.

४) राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटीचे व शर्तींचे पालन करणे महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणास बंधनकारक राहील.

५) सदर रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांचेमार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांना अदा करणेसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री मनोहर बंदपट्टे, अवर सचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. म.बा.हजारी, उपसचिव, पर्यावरण विभाग यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी Maharashtra Coastal Zone Management Authority यांच्या नावे रुपये १ कोटी ६० लाख इतक्या निधीचा धनादेश काढावा.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक यु-४, ३४३५ परिस्थितीकी व पर्यावरण, राज्य नदी संवर्धन योजना ३४३५ १३२९ अंतर्गत पुनर्विनियोजनाद्वारे महाराष्ट्र किनारी क्षेत्र प्राधिकरण ३४३५ १२९४ या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध झाल्यानूसार सन २०१७-१८ मधील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा."

३. सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ५९/२०१८, दिनांक २८/०३/२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनूसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११६२९२०१२०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manohar Ramchandra Bandpatte

Digitally signed by Manohar Ramchandra Bandpatte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0cfbfeeede9517aa9b96ad1d49625c9c5ad8e7d6dc787d92279da33b569805fb, serialNumber=bb7b9a28cd6d8e2b1fa8f60d210258464e6ece204d02617fbb7ed6be3db6752c, cn=Manohar Ramchandra Bandpatte
Date: 2018.03.31 16:29:44 +05'30'

(मनोहर बंदपट्टे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

२) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) महालेखापाल १ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५) निवड नस्ती.

प्रत माहितीसाठी,

१) मा.मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ३२.
३) अपर मुख्य सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.